(60)

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** तोफखाना
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0953 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/08/2024 21:08

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 24/08/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/08/2024
**Time From (वेळेपासून):** 11:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/08/2024 **Time (वेळ):** 20:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 110
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/08/2024 21:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वसंतराव नाईक विमुक्त,जाती व भटक्या जमाती,विकास महामंडळ कार्यालय,अहमदनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नितीन अनिल दातीर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वांजुळपोई,ताराहुरी,जिअहमदनगर,तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वांजुळपोई,ताराहुरी,जिअहमदनगर,तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9423787397

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्तु आश्रुबा सांगळे | | | 1. मोरेश्वर अपार्टमेंटवाणी नगर, पाईपलाईन रोड,सावेडी, अहमदनगर,तोफखाना, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 5,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.26/08/2024मी नितीन अनिल दातीर वय 26वर्षेव्यवसाय.-इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स दुकाण,रा. वांजुळपोई,ता.राहुरी,जि.अहमदनगर मो.नं.9423787397समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,मी वरील पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन इलेक्ट्रीकल्स व इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान चालवितो.दि.24/08/2024 रोजी ला.प्र.वि. अहमदनगर कार्यालयामध्ये माझा आतेभाऊ श्री.अविनाश आण्णासाहेब विरकर,रा.धनगरवाडी,ता.नेवासा,जि. अहमदनगर यांचेसह हजर होवुन पोलीस निरीक्षक श्री.राजु आल्हाट यांची भेट घेवुन त्यांना लाचमागणीची तक्रार सांगितली.त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी कार्यालयात हजर असलेले प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील पंच कर्मचारी व सापळा पथकातील कर्मचारी यांचेशी माझी ओळख करून दिली.त्यानंतर पंचांनी माझी तक्रार विचारली असता मी माझे पुर्ण नांव पत्ता सांगुन माझी तक्रार सांगितली की,माझे अंमळनेर,ता.नेवासा,जि.अहमदनगर येथे मागील चार वर्षापासुन लक्ष्मी इलेक्ट्रीकल्स अँण्ड इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान आहे.सदर व्यवसायासाठी मला पैशांची आवश्यकता असल्याने मी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळातर्फे राबविण्यात येणा-या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेबाबत माझा आतेभाऊ श्री.अविनाश विरकर याचेकडुन माहिती घेतली.याने मला सदर योजनेचा लाभ मिळविण्याकरीता ऑनलाईन अर्ज भरून कागदपत्रे सदर महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री.सांगळे यांचेकडे जमा करणेबाबत सांगितले.त्याप्रमाणे मी दि22/08/2024रोजी सदर योजनेचा फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरून सदर फॉर्म व कागदपत्रांच्या प्रती घेवुन मी सदर महामंडळ कार्यालय येथे जावुन सदर महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री.सांगळे यांची भेट घेतली व त्यांना मी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ मिळण्याकरीता ऑनलाईन फॉर्म भरला असल्याचे सांगुन त्यांच्याकडे मी भरलेल्या फॉर्मची प्रत व त्यासोबत लागणा-या कागदपत्रांच्या छायांकित प्रती दिल्या.त्यांनी सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता अर्जदाराने सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर सदर महामंडळाच्या वरिष्ठ कार्यालयातर्फे पात्रता प्रमाणपत्र (LetterOfIntent)दिले जाते असे सांगितले.मी त्यांना पात्रता प्रमाणपत्र कधी मिळेल याबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर प्रमाणपत्र मिळण्याकरीता ऑनलाईन अर्ज व सोबत जोडलेली कागदपत्रे त्यांचे मार्फतीने सदर महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पडताळणीकरीता पाठविली जातात असे सांगुन माझा ऑनलाईन अर्ज व कागदपत्रे पडताळणीकरीता प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविण्याकरीता 5500/-रुपये मला दयावे लागतील,असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली.मी त्यांना माझेकडे आता पैसे नाहीत असे सांगितले.त्यावेळी त्यांनी मला दि24/08/2024रोजी पैसे घेवुन त्यांचे कार्यालयात येण्यास सांगुन त्यांचेषी ओळख असलेला माझा आतेभाऊ श्री.अविनाश विरकर याला सोबत घेवुन येण्यास सांगितले.सदर योजनेचा लाभ मिळण्याकरीता कुठल्याही प्रकारचा खर्च लागत नसल्याचे मला माहिती आहे. त्यामुळे श्री.सांगळे साहेब हे माझेकडे वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा मी भरलेला ऑनलाईन अर्ज प्रादेषिक कार्यालयाकडे पाठविण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे लाचेची मागणी करत असल्याचे माझ्या लक्षात आले.मला श्री. सांगळे साहेबांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी आज माझा आतेभाऊ विरकर याला सोबत घेवुन वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ येथे जावुन श्री.सांगळे साहेब यांची भेट घेणार आहे.त्यादरम्यान श्री.सांगळे यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी.अषी तक्रार मी माझे स्वःहस्ताक्षरात लिहुन दिली.त्यावर मी,पंचांनी व पोनि श्री.आल्हाट यांनी सहया केल्या.त्यानंतर मी श्री.सांगळे यांचेविरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि श्री.आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापरा बाबत माहिती समजावून सांगितली.त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर सुरु करून त्यामध्ये पोनि श्री.आल्हाट,दोन्ही पंच,माझे व आतेभाऊ विरकर यांचे निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या.त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी

व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे ताब्यात देवुन मला,पंच नं.1व माझा आतेभाऊ अविनाश विरकर अशांना श्री.सांगळे यांची भेट घेण्यासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,अहमदनगर येथे दि. 24/08/2024रोजी11/23वाजेचे सुमारास दोन मोटार सायकलवर रवाना केले.त्याप्रमाणे मी,पंच नं.1व आतेभाऊ विरकर असे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,अहमदनगर येथे जावून लोकसेवक सांगळे यांची भेट घेतली असता,लोकसेवक सांगळे यांनी मला काही गोष्टी दिल्या घेतल्याशिवाय होत नाहीत,तुझे प्रकरण पाच लाखाचे आहेतुला साडेपाच हजार रूपये खर्च येईल,विरकरला सगळे माहिती आहे,मंजुरीसाठी वेळ लागेल,लवकर करायचे असेल तर तुला पैसे दयावेच लागतील,खर्च करावाच लागणार आहे,असे म्हणुन मी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळातर्फे राबविण्यात येणा-या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ मिळण्याकरीता भरलेला ऑनलाईन अर्ज प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे 5,500/-रुपये लाचेची मागणी केली.मी त्यांना अध्र्या एक तासात येतो असे सांगुन मी,पंच नं.1, आतेभाऊ विरकर असे दोन मो.सा.वरून ला.प्र.वि कार्यालयात 12/11 वा.दरम्यान परत आलो.त्यानंतर तेथे पोनि आल्हाट यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.माझे सोबत आलेले पंच नं.1यांना श्री.सांगळे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यन्तच्या हकिकती बाबत विचारता त्यांनी मी वरील प्रमाणे सांगितलेले हकीकती प्रमाणे हकीकत सांगितली.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले.ते मी व पंच नं.1यांनी कथन केले हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री झाली.त्यामध्ये श्री.सांगळे यांनी माझेकडे5,500/-रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निषपन्न झाल्याने त्यांचे विरूध्द लाचेची सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला लाकसेवक सांगळे यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझ्या बचतीतुन हजर केलेले 5500/-रूपये,त्यात 500/-रु.दराच्या 11चलनी नोटा असे समक्ष हजर केले.त्यानंतर अँन्थ्रॉसिन पावडरचा वापर,गुणधर्म व अ.व्हा दिव्या बाबत मला व पंचाना माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना पोना लाड यांनी अँन्थ्रॉसिन पावडर लावली व नोटांची घडी माझ्या अंगातील शर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. तसेच त्यानंतर मला, पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई सबंधी सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेषीर कारवाई करण्यात आली. त्यानंतर लोकसेवक सांगळे यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. पोनि आल्हाट यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला,मला,पंच नं.1व माझा आतेभाऊ विरकर अशांना श्रीसांगळे यांची भेट घेण्यासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,अहमदनगर येथे13/13वा.चे सुमारास दोन मोटार सायकलवरून रवाना केले.आमचे पाठोपाठ पोनि श्री.आल्हाट व सापळा पथक असे षासकिय वाहनाने आमचे पाठोपाठ निघाले.त्यानंतर मी,पंच नं.1व आतेभाऊ विरकर असे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,अहमदनगर कार्यालयात गेलो.तेथे सांगळे यांचे कार्यालय बंद होते.मी सांगळे यांना माझे मोबाईल वरून फोन केला असता त्यांनी ते साडेबारा वाजेपर्यंत थांबले होते,आता गावाकडे निघुन गेले असल्याचे सांगितले.मी त्यांना परत भेट कधी होईल असे विचारले असता त्यांनी उदया राहुरीला आहे मी असे सांंगितले.त्यावेळी मी त्यांना परवा कार्यालयात आलो तर चालेल का,असे विचारले असता त्यांनी चालेल,मला परवा एक फोन करा असे सांगितले.त्यानंतर मी,पंच नं.1व आतेभाऊ विरकर असे परत ला.प्र.वि कार्यालयात आलो. त्यानंतर सदरची कारवाई तात्पुरती स्थगीत करण्यात आली.त्यानंतर सापळा कारवाई सोमवार दिनांक 26/08/2024 रोजी आयोजित करण्याचे ठरले.दि.24/08/2024रोजी पोनि आल्हाट यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे आज दि.26/08/2024रोजी सकाळी10.30वा.चे सुमारास मी व आतेभाऊ विरकर असे ला.प्र.वि.कार्यालय अहमदनगर येथे आलो.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी दि.24/08/2024रोजी सापळा कारवाई तात्पुरती स्थगितीचे वेळी माझे ताब्यातुन घेतलेल्या अँन्थ्रॉसिन पावडर लावलेल्या नोटा दाखवून सदरच्या नोटा हया त्याच असल्याची माझी व दोन्ही पंचांची खात्री करून देवुन सदरच्या नोटा माझे शर्टाचे डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला व पंच नं.1यांना तसेच सापळा पथकास सापळ्या दरम्यान करावयाचे कारवाईचे अनुषंगाने सुचना समजावुन सांगितल्या.पोनि आल्हाट यांचे सुचनेवरून पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे ताब्यात देवुन मला व पंच नं.1 यांना 11/23 वा. माझेकडील दुचाकी वाहनाने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,अहमदनगर येथे श्री.सांगळे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले.आमचे पाठोपाठ पोनि आल्हाट व सापळा पथकाने येवून वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,अहमदनगर येथे आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबले.त्यानंतर थोडया वेळाने सांगळे यांनी मला सदर कार्यालयाच्या पार्किंगमध्ये येण्यास सांगितले.त्याप्रमाणे मी पार्किंगमध्ये गेलो.तेथे सांगळे यांनी मला पैसे आणले का विचारले असता मी माझे शर्टच्या खिशातील लाचेची

रक्कम सांगळे यांचेकडे दिली व सापळा पथकास दिसेल अशा रितीने माझा डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवून लाच स्विकारलेचा पुर्व नियोजीत इशारा केला.ती वेळ12/04वाजेचे सुमाराची होती.तो इशारा पाहुन पोनि आल्हाट व सापळा पथक असे माझ्याजवळ आले.पोकाँ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी सांगळे यांना त्यांचे पुर्ण नाव,पद व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दत्तु आश्रुबा सांगळे,वय 57वर्षेप्रादेषिक व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,छत्रपती संभाजी नगर,अतिरिक्त कार्यभार जिल्हा व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, अहमदनगर,रा.मोरेश्वर अपार्टमेंटवाणी नगर,पाईपलाईन रोड,सावेडी,अहमदनगर असे सांगीतले.लोकसेवक सांगळे यांना पकडुन त्यांचेकडील लाचेची रक्कम5500/-रु हस्तगत करण्यात आली.समाजकल्याण कार्यालयातील कक्षात लोकसेवक सांगळे यांच्या आवश्यक त्या तपासण्या करण्यात आल्या.त्यानंतर माझे हाताची व शर्टाची तपासणी करण्यात आली.त्यानंतर ला.प्र.वि.अहमदनगर येथे येवुन पोनि आल्हाट यांनी पंचनाम्याचे पुढील कामकाज केले आहे.तरी दिनांक 24/08/2024रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी11/23ते 12/11वाजेच्या दरम्यान यातील लोकसेवक सांगळे यांची मी महामंडळाच्या कार्यालयात जावुन भेट घेतली.त्यावेळी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळातर्फे राबविण्यात येणा-या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ मिळण्याकरीता भरलेला ऑनलाईन अर्ज प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे5,500/-रु. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.26/08/2024 रोजी सापळा कारवाई वेळी11/23 ते 12/04वा. दरम्यान आयोजीत सापळा कारवाई दरम्यान पंच नं.1यांचे समक्ष वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,अहमदनगर कार्यालयाच्या पार्किंगमध्ये स्विकारली.म्हणून माझी सांगळे यांचेविरूध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

AANAND ASHOK KOKARE(I (Inspector)) / DGPAAKM8102 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** AANAND ASHOK KOI
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** DGPAAKM8102

पोलीस ठाणे अमलदार
तोफखाना पो. स्टेशन
अहमदनगर